**22 व्या क्षेपणास्त्र युद्धनौका तुकडीला राष्ट्रपती स्टॅण्डर्ड सन्मान प्रदान करण्याच्या सोहळ्यात राष्ट्रपती श्री रामनाथ कोविंद यांचे भाषण**

मुंबई, डिसेंबर 8, 2021

- महाराष्ट्राचे राज्यपाल श्री भगत सिंह कोश्यारी,
- नौदलप्रमुख ऍडमिरल आर हरी कुमार
- सन्माननीय अतिथी,
- अधिकारी आणि पथसंचालनात सहभागी जवान,
- बंधू आणि भगिनींनो,

1. भारतीय नौदलाच्या या 22व्या क्षेपणास्त्र युद्धनौका तुकडीला राष्ट्रपती स्टँडर्ड हा सन्मान प्रदान करण्याच्या या अविस्मरणीय समारंभाचा, आपल्या सर्वांसोबत एक भाग होण्याची संधी मला मिळाली, याचा मला अत्यंत आनंद होत आहे. हा सन्मान मिळवणाऱ्या या तुकडीतील सर्व अधिकारी आणि खलाशांच्या चमूचे मी मनःपूर्वक अभिनंदन करतो. तसेच, आज आपण केलेले अतिशय उत्तम आणि अचूक पथसंचलन अतिशय प्रभावी होते, त्याबद्दलही मी तुम्हा सर्वांचे अभिनंदन करतो.

2.सध्या आपला देश 'स्वर्णिम विजय वर्ष' साजरे करत असतांनाच, हा सन्मान प्रदान करणे अतिशय औचित्यपूर्ण आहे. राष्ट्रपती स्टॅण्डर्ड सन्मान प्रदान करणे म्हणजे या तुकडीच्या विद्यमान आणि माजी अधिकारी तसेच नाविकांनी राष्ट्राप्रती केलेल्या अतुलनीय सेवा आणि समर्पणाला दिलेली पावतीच आहे.

3. या 22 व्या क्षेपणास्त्र युद्धनौका तुकडीचा गेल्या पाच दशकांतला प्रवास सातत्यपूर्ण यशाचा राहिला आहे. या तुकडीच्या वैभवशाली इतिहासाची सुरुवात सत्तरच्या दशकात झाली ज्यावेळी आपण तेव्हाच्या सोव्हिएत रशियाकडून ओएसए वन दर्जाची आठ जहाजे नौदलाच्या ताफ्यात समाविष्ट करण्यात आली. जलद गती आणि हल्ला करण्याच्या क्षमतेसाठी ओळखल्या जाणाऱ्या या युद्धनौकांनी 1971 च्या युद्धात अत्यंत महत्वाची भूमिका बजावली. अगदी चारच दिवसांपूर्वी आपण नौदल दिन साजरा केला. आपल्याला सगळ्यांना माहित आहेच, की भारतीय नौदलाने 1971 च्या

युद्धात अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागरात केलेल्या पराक्रमाचे स्मरण म्हणून आपण नौदल दिन साजरा करतो.

4. नौदलाचे ऑपरेशन ट्रायडेंट आणि पायथन मध्ये आपल्या युद्धनौकांनी पश्चिम सागरी किनाऱ्यावर पाकिस्तान नौदलाच्या नौका बुडवल्या आणि  शत्रूच्या युद्धाच्या प्रयत्नांना जीवघेणा झटका दिल्याचे आपण पाहिले आहे. पन्नास वर्षांपूर्वी, या दिवशी, म्हणजे 08 डिसेंबर रोजी, या किलर स्क्वाड्रन जहाजांनी कराची बंदर जाळत, शत्रूचे मनोबल खच्ची केले. कराचीवर नाकेबंदी केली आणि संपूर्ण समुद्रावर नियंत्रण मिळवले. खरे तर, प्रामुख्याने देशाच्या किनाऱ्याच्या संरक्षणासाठी आणलेल्या या युद्धनौका आपल्या नौदलासाठी युद्धातील सर्वात शक्तिशाली लढावू ताकद ठरली. ही लढाई म्हणजे,  आपल्या नौदलाच्या जवानांच्या कुशाग्रतेचे आणि शौर्याचे प्रतीक ठरली आहे.

5. गेल्या अनेक वर्षात, वीर आणि प्रबळ  श्रेणीच्या जहाजांच्या समावेशाद्वारे ‘किलर’ तुकडी (स्क्वॉड्रन)  सतत विकसित होत आहे. प्रबळ श्रेणीची जहाजे भारतात विकसित केली  गेली आहेत, ही आपल्यासाठी विशेष आनंदाची बाब आहे.  ‘आत्मनिर्भर भारता’प्रती भारतीय नौदलाची दूरदृष्टी आणि स्वदेशीकरणाविषयीच्या वचनबद्धतेचेच हे द्योतक आहे. नौदलाची ही वचनबद्धता, 17 व्या शतकात  भारतात,  युद्धासाठी सज्ज अशा नौदलाची उभारणी करणारे, नौदलाचे संस्थापक,  द्रष्टे राजे म्हणून अनेक इतिहासकार ज्यांना मानतात अशा छत्रपती शिवाजी महाराजांना मानवंदनाच आहे, असे मी मानतो.

6.  या तुकडीने उल्लेखनीय शौर्य आणि विशिष्ट सेवेसाठी अनेक सन्मान आणि पुरस्कार मिळवले आहेत, हे नमूद करतांना मला विशेष आनंद होत आहे. . यात महावीर चक्र, वीर चक्र आणि नौदल पदकांचा समावेश आहे, हे सर्व सन्मान किलर स्क्वॉड्रनच्या शौर्याचाच पुरावा आहेत.

बंधू आणि भगिनींनो,

7. या तुकडीची जहाजे अनेक मोहिमांसाठी तैनात करण्यात आली होती, असे मला मला सांगण्यात आले आहे. या वेगवगेळ्या मोहिमांच्या माध्यमातून ही तुकडी सातत्याने आपल्या  सागरी सीमा सुरक्षित ठेवत आहे. ओमानचा आखाती प्रदेश आणि पर्शियन खाडीमध्ये अनेक सामरिक मोहिमा तसेच, चाचेगिरीविरोधी कारवायाही या युद्धनौका पार पाडत असतात.

८. आपले राष्ट्र, सागरी राष्ट्र आहे आणि आपल्या परराष्ट्र धोरणाच्या प्रगतीत तसेच आपल्या राष्ट्रीय हितसंबंधांचे आणि व्यावसायिक आकांक्षांचे संरक्षण करण्यात आपल्या नौदलाची भूमिका अतिशय महत्वाची आहे. भारतीय नौदल आपल्या व्यापक सागरी हितांचे यशस्वीपणे रक्षण करत आहे, ही अत्यंत समाधानाची बाब आहे.

९. आंतरराष्ट्रीय सागरी व्यापारापैकी बराचसा व्यापार हिंद महासागर प्रदेशांतून जातो. त्यामुळे या प्रदेशात शांतता आणि सुव्यवस्था राखणे केवळ आपल्यासाठीच नाही तर संपूर्ण जागतिक समुदायासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. आज, जगातील सर्वात मोठ्या नौदलांपैकी एक असलेल्या भारतीय नौदलाकडे आपले सागरी शेजारी हिंद महासागर प्रदेशातील एक पसंतीचे सुरक्षाविषयक भागीदार म्हणून अपेक्षेने पाहत आहेत.

10. हिंद-प्रशांत क्षेत्रात येणाऱ्या भू-राजकीय आव्हानांचा सामना करण्यात, महत्त्वाची भूमिका बजावण्याची संधी भारताला मिळाली आहे. या प्रदेशातील प्रमुख नौदलांपैकी एक म्हणून, भारतीय नौदलाने सर्व प्रादेशिक वचनबद्धतेची पूर्तता करण्यासाठी आणि हिंद-प्रशांत क्षेत्रातल्या भागीदारांसोबतचे आपले संबंध अधिक दृढ करण्यासाठी महत्त्वपूर्ण प्रयत्न केले आहेत, अशी माहिती मला देण्यात आली आहे.

11. देशात आणि देशाबाहेर मानवतावादी संकटे किंवा नैसर्गिक आपत्तींच्या वेळी लोकांना मदत करण्यातही भारतीय नौदल आघाडीवर आहे, हे नमूद करतांना मला विशेष आनंद होत आहे. कोविड-19 च्या संकटात भारतीय नागरिकांना मायदेशी परत आणण्यात तसेच तौक्ते चक्रीवादळादरम्यान बचाव कार्यातही भारतीय नौदलाने अतिशय महत्वाची भूमिका बजावली. खवळलेल्या, धोकादायक अशा सागरी परिस्थितीतही तुमचे विलक्षण धैर्य आणि प्रयत्नांमुळे अनेक नागरिकांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना दिलासा मिळाला होता. नैसर्गिक आपत्ती, संकट आणि प्रतिकूल परिस्थितीचा सामना करणाऱ्या लोकांना मदत आणि दिलासा देण्यासाठी तुम्ही केलेल्या अथक प्रयत्नांबद्दल मी तुम्हा सर्वांचे अभिनंदन करतो.

बंधू आणि भगिनींनो,

12. आजच्या या अविस्मरणीय प्रसंगी, मी या तुकडीतील सर्व ज्येष्ठ तसेच, सेवेत असलेल्या जवानांनी देशासाठी केलेल्या महान सेवेबद्दल त्यांचे अभिनंदन करू इच्छितो. मला सांगण्यात आले

आहे की 1971 च्या युद्धात ऑपरेशन ट्रायडंटचा भाग असलेले काही ज्येष्ठ अधिकारी सैनिकही आज या कार्यक्रमात सहभागी झाले आहेत, असे मला सांगण्यात आले आहे. टाळ्यांच्या गजरात आपण त्यांच्याबद्दलची कृतज्ञता व्यक्त करूया. आपण मोठ्या सन्मानाने देशाची सेवा केली आहे. तुमच्या अथक प्रयत्नांनी आणि बलिदानामुळे आपले राष्ट्र अधिक मजबूत आणि सुरक्षित झाले आहे. देशाच्या रक्षणासाठी सर्वोच्च बलिदान देणारे शूर खलाशी आणि अधिकाऱ्यांनाही मी श्रद्धांजली अर्पण करतो. भारत त्यांचा आणि त्यांच्या कुटुंबियांचा सदैव ऋणी राहील.

13. भारतीय नौदलाच्या 22 व्या क्षेपणास्त्र युद्धनौका तुकडीला भविष्यासाठी खूप खूप शुभेच्छा देतो. देशाला तुमचा अभिमान आहे. मी तुम्हाला आणि तुमच्या कुटुंबियांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देतो.

M.Chopade/S.Kane/P.Malandkar